■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३२९ ■ रविवार दि.१७ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 329 ■ Sunday Dt. 17 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीडमध्ये नशा मुक्तीचा संदेश; मोटरसायकल मॅरेथॉन रॅलीत पोलिस व नागरिकांनी घेतला उत्साहाने सहभाग..

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक
महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# बीड पोलीस दलाची जबरदस्त मोहीम; नशा मुक्तीसाठी मोटरसायकल मॅरेथॉन रॅली

## पोलीस प्रशासनाचे आकर्षक चेहरा; एसपी नवनीत कॉवत यांनी बीडकरांचे मन जिंकले!



**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील छत्रपती संभाजी राजे क्रीडांगणातून काल बीड जिल्हा पोलीस दलाकडून नशा मुक्ती जनजागृतीसाठी मोटरसायकल मॅरेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत पोलीस अधीक्षकांसह पोलीस विभागातील विविध अधिकारी, पत्रकार, समाजसेवक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले. रॅलीचे प्रमुख उद्दिष्ट युवकांमध्ये नशाबंदीबाबत जागरूकता निर्माण करणे आणि समाजात नशा मुक्तीचा संदेश पोहचवणे होते. रॅलीमध्ये सहभागी झालेल्यांनी विविध रस्त्यांवरून मार्गक्रमण करत नागरिकांना नशापासून दूर राहण्याचे महत्त्व सांगितले.**

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी यावेळी सर्व सहभागींचे कौतुक करत रॅलीमुळे नशा प्रतिबंध विषयक जनजागृतीला चालना मिळेल असे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पोलीस दल आणि स्थानिक संघटनांचे सहयोग महत्त्वाचे ठरले. हा उपक्रम पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या माध्यमातून साकारला गेला. या मॅरेथॉनचा उद्देश समाजात नशा मुक्ती संदर्भात जनजागृती निर्माण करणे तसेच युवकांना व्यसनमुक्त जीवनशैलीकडे प्रेरित करणे आहे.

बीड शहर व जिल्ह्यातील नागरिक, प्रतिष्ठित व्यक्ती, व्यापारी, समाजसेवक, पोलीस अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्वत: मोटरसायकलवर बसून रॅलीत सक्रिय सहभाग घेतला आणि सहभागींचा उत्साह वाढविला. रॅलीतून नागरिकांमध्ये नशापासून दूर राहण्याचे महत्त्व समजावून सांगितले गेले व जनजागृतीला चालना मिळाली.









## अॅड. शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली भव्य राष्ट्रीय एकात्मता रॅली उत्साहात

## बीडमध्ये पहिल्यांदाच तिरंगा रॅलीचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

अॅड. शेख शफीक भाऊ यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली –खचखच् मुख्य कार्यालय, बशीरगंज येथून सुरू झालेली भव्य राष्ट्रीय एकात्मता रॅली आज हजारोंच्या संख्येने उपस्थित नागरिकांच्या उत्साहपूर्ण सहभागाने यशस्वीपणे संपन्न झाली. या रॅलीने सामाजिक एकता, बंधुभाव आणि राष्ट्रीय अभिमानाचा संदेश सर्वदूर पोहोचवला. सकाळी –खचखच् मुख्य कार्यालयापासून सुरू झालेल्या या रॅलीत विविध समाज घटकांतील युवक, आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. हिंदुस्थान जिंदाबाद, हम सब एक है, हिंदू–मुस्लिम भाई–भाई आणि अशा नाऱ्यांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. रॅलीच्या मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी रॅलीचे स्वागत केले, ज्यामुळे एकतेचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

रॅलीचा मार्ग –खचखच् मुख्य कार्यालयापासून सुरू होऊन शिवाजी महाराज पुतळा, शहेनशाहा नगर, बार्शीनाका, मोमीन पुरा, डॉ. आंबेडकर चौक, माळीवेस, बलभीम चौक, कारंजा मार्गे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण (मल्टिपर्पज ग्राउंड) येथे पोहोचला. मार्गात ठिकठिकाणी स्थानिक नागरिकांनी रॅलीला प्रचंड प्रतिसाद देत सहभाग घेतला. रॅलीदरम्यान सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकता

▶ पान २ वर

## भरपावसात गोदावरी पात्रामध्ये स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये चालणाऱ्या विनापरवाना बेकायदेशिररित्या वाळू उपसा करणाऱ्या ईसमांवर कारवाई करण्याचे स्थानिक गुन्हे शाखा बीड यांना आदेशित केले होते त्यावरुन दि.१६.०८.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप् बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, मौजे म्हाळसपिंपळगांव शिवारातील गोदावरी नदी पात्रामध्ये अवैध विनापरवाना बेकायदेशिररित्या वाळू उपसा सुरु आहे.

पथकाने सदरील ठिकाणी जावुन गोदावरी नदी पात्रामध्ये छापा मारला असता पोलीसांना पाहुन वाळू उपसा करणारे टॅक्टर, रोडर हे पळुन गेले, पोलीसांनी टॅक्टर व रोडरचा पाठलाग करुन टॅक्टर व रोडर पकडले परंतु त्याचे दोन्ही चालक बाजुस असलेल्या शेतामध्ये पळुन गेले. गोदावरी नदीपात्रामध्ये अवैध वाळू उपसा करुन चोरटी वाहतुक करीत असलेल्या एक टॅक्टर व टॅक्टर रोडस असे एकुण ९,५०,०००/– रु मुद्देमाल जप् करुन दोन्ही पळुन गेलेल्या चालकांविरुध्द पोलीस ठाणे गेवराई येथे गु.र. नं ४९२/२०२५ कलम ३०३(२), ३ (५) भारतीय न्यास संहीता कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील गुन्हयाचा पुढील तपास पोलीस ठाणे गेवराई हे करीत आहेत.

सदरील कामगिरी नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक, बीड, सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, नितीन वडमारे, पोलीस अंमलदार अर्जुन यादव, आशपाक सय्यद, मनोज परजणे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.



## चोरीतील आरोपी व मुद्देमाल पोलीसांच्या ताब्यात

### संभाजीनगर परळी वै. पोलीसांची कौतुकास्पद कारवाई

**बीड । प्रतिनिधी**



दि.१४/०८/२०२५ रोजी फिर्यादी नामे नाथराव माणिकराव फड वय ६७ वर्षे व्यवसाय सेवानिवृत रा.शंकर पार्वती नगर परळी वै. ता. परळी वै, जि. बीड यांनी पोलीस स्टेशन संभाजीनगर परळी वै, येथे फिर्याद दिली की, दि. १३/०८/२०२५ रोजी १०.५५ वा. चे दरम्यान परळी बस स्थानक येथुन अंबाजोगाई येथे जाण्यासाठी बस मध्ये चढत असताना त्यांचे गळ्यातील सोन्याचा गोप वजन २५ ग्रॅम सध्या किं. अंदाजे २,५०,०००/ रुपयेची सोन्याचा गोप कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरले बाबत. पो.स्टे. संभाजीनगर येथे दि. १४/०८/२०२५ रोजी गु.र.नं. १६४/२०२५ कलम ३०३(२) इछ्ड अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पो.नि. ढोणे यांचे आदेशाने सदर गुन्ह्याचा तपास सफौ, ६१३ सौदनकर यांचेकडे देण्यात आला.

गुन्हयाचे संदर्भात व फिर्यादी हा जेष्ठ नागरीक असलायने मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे व मा. अ.पो.अ. श्रीमती तिडके मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीयपोलीस अधिकारी श्री. शिंदे यांचे सुचने प्रमाणे परळी शहरात नविन अद्यावत बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेरेच्या फुटेजच्या आधारे तसेच सायबर सेल यांची तांत्रीक मदत घेवुन सदर गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचा शोध घेतला असता सदरचा गुन्हा आरोपी नामे प्रकाश श्रीराम जाधव वय ३४ वर्षे रा. हिवरसिंगा ता. शिरूर जि. बीड याने केला असल्याचे निषपन्न झाल्याने पो.स्टे. संभाजीनगर डी. बी. पथक यांनी खोकर मोहा ता. शिरूर जि. बीड

▶ पान २ वर

# कुंबेफळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ; व्यापक जनजागृती

## अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचा स्तुत्य उपक्रम



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुंबेफळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. तसेच व्यापक जनजागृतीचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम, त्यामागील गुन्हेगारी साखळी, कायदेशीर शिक्षा आणि सुरक्षित पर्यायांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शनिवार, दिनांक १६ ऑगस्ट रोजी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या वतीने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे एपीआय श्री.जगताप यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधत, 'अंमली पदार्थांचे व्यसन केवळ वैयक्तिक आयुष्यच उद्ध्वस्त करीत नाही, तर कुटुंब, समाज आणि भविष्यासाठ मोठा धोका ठरते असा इशारा ही त्यांनी दिला. व्यसनांमुळे होणारे सामाजिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक नुकसान प्रभावीपणे मांडले जात आहेत. हे जनजागृती अभियान केवळ विद्यार्थ्यांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण ग्रामीण भागात पोहोचावे, अंमली पदार्थांविरोधात कठोर मानसिकता तयार व्हावी, हा यामागचा उद्देश असल्याचे पोलिस प्रशासनाकडून सांगण्यात आले. पोलिसांच्या या अभियानाचे नागरीकांतून स्वागत होत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामीण भागात 'नशामुक्त बीड जिल्हा - आपला संकल्प, आपलं भविष्य आपल्या हाती !' हे अभियान बीड जिल्हा पोलिस प्रमुख नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे निरीक्षक मुरलीधर खोकले यांच्या पुढाकाराने प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. 'व्यसन नष्ट करणे म्हणजे केवळ स्वतःचे नव्हे तर संपूर्ण समाजाचे रक्षण करणे.', अंमली पदार्थ आणि नशा आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि समाजाच्या प्रगतीसाठी घातक आहेत., व्यसनांमुळे स्वप्नं विझतात, नाती तुटतात, आणि आयुष्य अंधारात जातं., तरूणांना आणि मुलांना नशेच्या सापळ्यात अडकू देऊ नका., आपलं गांव, नशामुक्त गांव. चला, एकत्र येऊन हे शक्य करू हा विधायक संदेश घेऊन अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाणे काम करीत आहे. चला, नशेच्या अंधारावर प्रकाश टाकूया नशामुक्त, निरोगी आणि प्रेरणादायी बीड जिल्हा घडवूया..! असा संकल्प बीड जिल्ह्यातील पोलिस प्रशासनाने घेतला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अंमली पदार्थांविरोधात पोलिसांकडून अभियान राबविण्यात आले. त्यानुसार विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. तसेच 'पोक्सो' या कायद्याची माहिती देण्यात आली.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती हजारे यांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे एपीआय श्री.जगताप, एएसआय राजेंद्र ननावरे व पोलीस जमादार प्रवीण उळे यांचे स्वागत केले. यावेळी शाळेतील वरिष्ठ शिक्षक निळकंठ जिरगे, श्रीमती मिना अंबुरे, संतोष गायकवाड, महादेव गायकवाड आदींसह इतरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निळकंठ जिरगे यांनी केले. प्रास्ताविक संतोष गायकवाड यांनी केले. तर उपस्थितांचे आभार महादेव गायकवाड यांनी मानले.



## ॲड. राज पाटील यांना वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान

**वडवणी । प्रतिनिधी**

लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ॲड. राज पाटील यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल वीर छत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार व अजिंक्यतारा २०२५ चा पुरस्कार अहिल्यानगर येथे रविवार दि १० ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आल्याने त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

वडवणी तालुक्यातील तिगावचे विद्यमान सरपंच तथा सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. राज पाटील यांनी लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून निसर्गसंवर्धन, जलसंधारण, शेती रस्ते, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच कोरोना काळात गरजूना अन्नधान्य व आरोग्यविषयक साहित्य पुरविण्याचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांनी आजपर्यंत हजारो वृक्षांचे वाटप केले असून, समाजात रक्तदानासह अवयव दान व मरणोत्तर देहदान जनजागृती सोबत, स्वतः ५० वेळा रक्तदान केले आहे, २७ वेळा रक्तदान शिबिर आयोजन व अवयव दान, मरणोत्तर देहदान फॉर्म भरला आहे. गावचे सरपंच म्हणून कार्य करताना त्यांनी सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून शेकडो सरपंचांच्या समस्या मांडून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांसाठी, शेती रस्ते व अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था, महाराष्ट्र राज्य आयोजित वीर भित्रपती महाराष्ट्र रत्न क्य तारा कार २ नर ज्यस्तरीय स हळा जलसंधारणाच्या माध्यमातून मोठे काम उभे केले आहे.

तसेच मराठा आरक्षणाच्या लढ्यातही गेल्या पाच वर्षांपासून त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल अहिल्यानगर येथील अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था महाराष्ट्र या संस्थेने घेतली. वीर शिव छत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार व अजिंक्यतारा २०२५ चा पुरस्कार नगर सेवक डॉ. सागर बोरुडे, रिल स्टार शिवानी बनकर क्टर सचिन चव्हाण, क्टर अर्जुन अंबेकर, सस्थेचे अध्यक्ष तुषार बोरुडे, अँकर सिमा डुकरे यांच्या हस्ते देण्यात आला. त्यांच्यावर सर्व स्तरांमधून अभिनंदनचा वर्ष होत आहे.

# दिंद्रुड पोलीस स्टेशनमध्ये गणेशोत्सव व ईद मिलाप च्या पार्श्वभूमीवर शांतता बैठकीचे आयोजन



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सव, ईद मिलाप व पोळा या सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड पोलीस स्टेशनला काल दि.१३ बुधवारी सायंकाळी शांतता बैठकीचे आयोजन करण्यात आले. नागरिकांनी प्रत्येक गावात हे सण, उत्सव आनंदाने शांततेत साजरे करावेत असे आवाहन दिंद्रुड पोलिसांच्या वतीने करण्यात आले.

येथील पोलीस ठाण्यात सपोनि महादेव ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी ढाकणे यांनी बोलताना सांगितले की, पोलीस हद्दीतील नागरिकांनी आदर्श गणेशोत्सव, आदर्श ईद ए मिलाप व आदर्श पोळा साजरा करावा. कायदा व सुव्यवस्था बिघडेल असा कुठलाही प्रश्न निर्माण होणार नाही. याची काळजी घेऊन सर्वांनी शांतता राखत आनंदी वातावरण ठेवावे असे तरुणांसह ग्रामस्थांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले. कमी मनुष्यबळ असताना देखील गणेश मंडळांना पोलीस, होमगार्ड देण्यात येऊन हद्दीत पेट्रोलिंग सह चोख बंदोबस्त ठेवण्यात येईल. गणेश मंडळांनी रात्रपाळीला दोन स्वयंसेवक ठेवावेत. जनतेने सर्व हेवेदावे, तंटे, भांडणं विसरून एकोप्याने पोळा व गणेशोत्सव साजरा करत सण उत्सव शांततेत पार पडले पाहिजेत.

जर कोणी शांततेचा भंग केला तर त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. तसेच प्रत्येक गावात एक गाव, एक गणपती धोरण प्रत्येक गावाने राबवावे. गणेशोत्सवात डि जे वर न नाचता पारंपरिक वाद्य झांज, लेझीम सारखे पथकं लावून शांततेत वाजतगाजत मिरवणूका काढाव्यात. तसेच मंडळाच्या वतीने महिलांच्या संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा, शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप करणे तसेच वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करणे. नशामुक्तीसाठी विविध प्रकारचे समाजप्रबोधनपर प्रदर्शन गणेशोत्सव मंडळात राबविण्यात यावेत. यामध्ये सामाजिक कार्यात सहभाग नोंदवून आदर्श गणेश मंडळांना विविध प्रकारचे बक्षीस पोलीस स्टेशनच्या वतीने जाहीर करण्यात येईल असे हि सपोनि ढाकणे यांनी यावेळी सांगितले.

बैठकीत जेष्ठ पत्रकार बंडुजी खांडेकर सह दिंद्रुड पत्रकार संघाची प्रमुख उपस्थिती होती. तर पोलीस हद्दीतील सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक पोलीस कर्मचारी व तरुणांची देखील यावेळी उपस्थिती होती. यावेळी जेष्ठ पत्रकार प्रकाश काशीद सह आदिंनी आपापले मनोगत व्यक्त केले. पोलीस उपनिरीक्षक सलमान शेख यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# बीड शहरातील १५ प्रमुख रस्त्यांसाठी मिळणार १०० कोटींहून अधिक निधी



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील नगरपरिषद हद्दीतील प्रमुख डी.पी. रस्त्यांचे सिमेंट काँक्रीट बांधकाम व नाली सुधारणा करण्यासाठी लवकरच १०० कोटींहून अधिक निधी मिळणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सन २०२३ मध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) २०२३-२४ अंतर्गत एकूण १७ रस्ते व नाली बांधकाम प्रकल्पांसाठी १५९ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता.

यापैकी २ रस्त्यांची कामे इतर योजनेतून पूर्ण झाली असून, आता उर्वरित १५ कामांसाठी नव्याने सुमारे १०० कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. अजितदादा पवार स्वतः निधी वितरणाबाबत बैठक घेणार असून, त्यानंतर मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होईल. याशिवाय, शहराच्या विकासासाठी अलीकडेच ५ कोटी रुपये घंटागाड्यांसाठी, ७.५० कोटी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी, तसेच ६ कोटी टॅक्स सव्र्व्हेसाठी मंजूर झाले आहेत. दरम्यान, बीड मतदारसंघासाठी भरघोस निधी दिल्याबद्दल ना. अजितदादा पवार यांचे डॉ. क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

पान १ वरून...

## बीडमध्ये पहिल्यांदाच तिरंगा रॅलीचे आयोजन

आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश आला.

रॅलीचा समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर राष्ट्रगीताने झाला. यावेळी उपस्थित सर्वांनी एकजुटीने राष्ट्रगीत गायन करत राष्ट्रीय अभिमान व्यक्त केला. ॲड. शेख शफीक भाऊ यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय एकतेचे महत्त्व अधोरेखित करत, सर्व समाजघटकांना एकत्र येऊन देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले. त्यांनी युवकांना सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी पुढाकार घेण्यास प्रेरित केले. या रॅलीला स्थानिक नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. रैलीच्या यशस्वी आयोजनाबद्दल ॲड. शेख शफीक भाऊ यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या रॅलीने न केवल शहरातच, तर संपूर्ण परिसरात राष्ट्रीय एकतेचा आणि बंधुभावाचा संदेश प्रभावीपणे पोहोचवला आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## चोरीतील आरोपी व मुद्देमाल पोलीसांच्या ताब्यात

येथुन आरोपीला ताब्यात घेवून नमुद आरोपीकडे सखोल तपास करून त्याचेकडून सोन्याचा गोप वजन २५ ग्रॅम किं. अंदाजे २,५०,०००/ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गुन्ह्याची पुढील कार्यावाही चालु आहे.

सदरची कामगीरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक डी. एस. ढोणे, ग्रेपोउपनि मिसाळ, सफौ सौंदनकर, व डी.बी. पथकातील सफौ नागरगोजे, पोह साजीद पठाण, पोअ.चव्हाण, पोअ. डोंगळे, पोअं. घुगे सर्व पो.स्टे. संभाजीनगर यांनी प्रभावीपणे कामगीरी बजावली आहे.

## श्री.संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त कीर्तन सोहळ्याला भाविक भक्तांनी उपस्थित राहावे : दळवी

**सिरसाळा । प्रतिनिधी**



सिरसाळा बुधवार दि.२० आगस्ट २०२५.रोजी मोजे सिरसाळा येथील श्री.संत सेना महाराज याच्या पुण्यतिथीनिमित्त किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला असून या सभागृह सिरसाळा येथे ठेवला आहे. तरी सिरसाळा परिसरातील भाविकानी श्री.ह.भ.प.स्नेहाताई बोरगावकर याच्या कीर्तन होणार या वेळी समाज बांधव उपस्थित राहणार आहेत. सुभाष झगडे, ठोबरे, वाघमारे, माऊली रगडे, बबलु रगडे, आदित्य झगडे असून सर्व भाविकानी उपस्थित राहावे असे अक्षय दळवी, शहर अध्यक्ष श्री.संत शिरोमणी सेना महाराज सामाजिक प्रतिष्ठान सिरसाळा याच्या वतीने करण्यात येत आहे. तरी सर्वानी उपस्थित राहावे असे कळविण्यात येत आहे.

## संदीपान साबळेची हवाई दलात निवड

**शिरूरकासार । प्रतिनिधी**



तालुक्यातील मालकाचीवाडी येथील संदीपान साबळे याची भारतीय हवाई दल ज्युनियर एअर ट्रॅफिक कंट्रोलरपदी नियुक्ती झाली असून गोंदिया येथे प्रशिक्षण पूर्ण करून छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय हवाई अड्डा मुंबई येथे नेमणूक करण्यात आली आहे. त्याच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शिरूरकासार तालुक्यातील डोंगर पट्ट्यात असणारे मालकाचीवाडी या गावात सामान्य शेतकरी कुटुंबात संदीपान याचा जन्म झाला. गावातीलच जिल्हापरिषदेच्या शाळेत तसेच भामेश्वर विद्यालय पाटोदा येथे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मराठी माध्यमातून घेतले.पुढे बीटेक,आयआय.टी असे शिक्षक घेत वाराणसी भारतीय हवाई दल ज्युनियर एअर ट्रॅफिक कंट्रोलर पदी नियुक्ती झाल्यांनतर गोंदिया येथे आठ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करून छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय हवाई अड्डा (सहारा) मुंबई येथे नेमणूक मिळाली असून सर्व स्तरावरून त्याचे अभिनंदन होत आहे.



## माणसाने जीवन जगत असताना अहंकार सोडला पाहिजे : मुकुंद महाराज जाटवळेकर

**आष्टी । प्रतिनिधी**

माणसाचं जीवन म्हणजे एक पाण्याचा बुडबुड आहे. त्यामुळे आपण अहंकारात कधी जगू नये आपला अहंकार कधीच पूर्ण होत नाही. त्यामुळे अहंकारात जगण्यापेक्षा आपण नम्रपणा घेतलेला व बारीक झालेले बरे असे मत हभप मुकुंद महाराज देवळेकर यांनी वारीकराव बापू दौलतराव झांजे यांच्या चोथ्या पुण्यस्मरण निमित्त पिंपरी घाटा येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

ते बोलताना पुढे म्हणाले की, अहंकार माणसाला नामशेष करतो जीवन हे क्षणभंगुर आहे. त्यामुळे प्रत्येकाने प्रत्येकाशी सौजन्याने वागावे जीवनात दुश्मनी भाऊबंदकी हे प्रकार न करता सगळ्यांची सोलकाने वागल्यास आपल्यालाही लोक चांगल्या प्रकारे सुरू केल्याने वागतात त्यामुळे अहंकार न ठेवता बारीक होऊन जर जीवन जगलं तर नक्कीच आपल्या जीवनात आपण यशस्वी होतो असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. या पुण्यस्मरण प्रसंगी आष्टी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अण्णासाहेब चौधरी, माजी जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब शिरसाट, पिंपरी गावचे सरपंच मोहन आमटे, घाटा येथील सरपंच प्रल्हाद मुळीक, शिवाजीराव कोल्हे, विकास आमटे, सुरेश आबा तळेकर, मच्छिंद्र मुळीक, विनायक मुळीक आदी मान्यवर असं राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवर या ठिकाणी उपस्थित होते. सर्वांनी बारीकराव बापू यांचे भाषणातून कौतुक करत त्यांच्या आयुष्यातल्या केलेल्या कामाला उजाळा दिला बारीकराव बापू झांजे हे त्यांनी त्यांचा आयुष्य धार्मिक क्षेत्रात समर्पित केलं होतं ते सतत धार्मिक क्षेत्रात कार्यरत असायचे त्यामुळे या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला, भगिनी व पुरुष वर्ग उपस्थित होता. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांना महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

# बीड जिल्ह्यात सीमा ओस्तवाल सारखं शैक्षणिक कार्यामध्ये योगदान कोणाचेच नाही : बडे





**बीड । प्रतिनिधी**

काल दि.१६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोठारबन या ठिकाणी गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आयोजित प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोठारबन यांच्यामार्फत आलेल्या सर्व मान्यवर यांचे स्वागत करण्यात आले आयोजक सौ.सीमाताई मनोज ओस्तावल या कार्यक्रमाचे अध्यक्ष सोमनाथ बडे तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे उपस्थिति म्हणून उजगरे साहेब गटशिक्षणाधिकारी वडवणी तसेच बी.एम. पवार सामाजिक कार्यकर्ते, श्रीराम मुंडे सामाजिक कार्यकर्ते, सुनील मुंडे केंद्रप्रमुख चिंचवन, धनराज मुंडे प्राचार्य गोरक्षनाथ महाविद्यालय ढेकणमोहा, गणेश मुंडे सामाजिक कार्यकर्ते या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून अशोकराव मुंडे सरपंच कोठारबन, भास्करराव मुंडे उपसरपंच कोठारबन, केशवराव मुंडे चेअरमन सेवा सहकारी सोसायटी कोठारबन, संतोष घुले शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष कोठारबन, प्रवीण मुंडे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष कोठारवन तसेच नामदेव मुंडे पोलीस पाटील कोठारबन तसेच ग्रामपंचायतचे सर्व सदस्य व व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

त्याचप्रमाणे या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक व मोठ्या प्रमाणामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी आयोजक श्रीमती सीमाताई ओस्तावल यांनी आपले मनोगत व्यक्त करताना या संस्थेमार्फत समाजातील गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी शिक्षण उपयोगी साहित्य तसेच इतर समाज उपयोगी साहित्याचे वाटप करणे. समाज जागृतीचे महत्त्वाचे काम पार पडत असलेल्या बाबतचे मनोगत व्यक्त केले तसेच पुढील वर्षी कारखाना स्थलांतर होणाऱ्या मुलांसाठी जास्तीत जास्त लवकर साहित्य उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबद्दल समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष सोमनाथ भाऊ बडे यांनी सांगितले की, या परिसरातील ६० ते ७० टक्के समाज हा कारखाना स्थलांतर होत असून या गोरगरिबाच्या शिक्षणासाठी गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आयोजित प्रयास फाउंडेशन मार्फत आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे कौतुक केले अशाच प्रकारे आपण विद्यार्थी इतर समाज यांच्या विकासासाठी मदत करण्याचा हा वसा पुढे चालवलेला आहे तो कौतुकास्पद आहे असे स्पष्ट केले. कार्यक्रमाची प्रस्ताविक धनराज मुंडे प्राचार्य गोरक्षनाथ महाविद्यालय ढेकणमोहा यांनी केले. या कार्यक्रमाला दैनिक पार्श्वभूमी चे ज्येष्ठ पत्रकार विनोद जोशी सर उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक तिडके सर, धाईतीडक सर, श्रीमती जाधवर मॅडम, राठोड सर, दासरे सर, जाधव सर, टिपरे सर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रकाश कुरकुटे सरांनी केली तर कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्वांचे आभार श्री जालिंदर भस्करे सरांनी मानले. हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी धनराज मुंडे सरांच्या मार्गदर्शनाखाली रमेश धाईतिडक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले. शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी मदत केली.

# राजयोगी, ऐश्वर्य संपन्न, सर्वांगीण समाज सुधारक, राष्ट्रसंत भगवान बाबा : मोहन महाराज खरमाटे

**बीड । प्रतिनिधी**

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी दि १३ऑगस्ट रोजी वर्ष १८वे श्रीसंत भगवान बाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ बीड येथे प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र सानप आयोजित बहुजनांचे दैवत ऐश्वर्य संपन्न राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या १२९ जन्मोत्सव व रामायण अरण्य कांड या ग्रंथाच्या सांगते. निमित्त कीर्तनसेवा प्रसंगी ह भ प.मोहन महाराज खरमाटे म्हणाले राष्ट्रसंत प्रातस्मरणीय भगवान बाबा हे कलियुगातील राजयोगी, ऐश्वर्य संपन्न, सर्वांगिन समाज सुधारक होते ते बहुजनांचे दैवत होते. या किर्तन सेवेसाठी खरमाटे महाराज यांनी ज.गु.तुकाराम महाराज यांचा संतपर प्रकरणातील ४ चरणाचा अभंग आता तुम्ही कृपावंत। साधुसंत जिवलग।। गोमटे ते करा माझे। भार ओझे तुम्हाशी।।



हा अभंग कीर्तन सेवेसाठी घेतला.

या अंगावर बोलतांना महाराजांनी आपणास सुख प्राप्ती साठी करावे लागणारे प्रयत्न, या साठी असणार्या अडचणी, जसे देवऋण, ऋशीऋण, पितृणातुन मुक्ती, सुखाची अपेक्षा संसार (प्रपंच) जीव, देव, यांचे कडुन करण्यापेक्षा संताकडून कसा प्राप्त होतो हे अनेक प्रमाणाने पटवून सांगितले. श्री संत भगवान बाबा यांनी खेड्यापाड्यात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दौरे करुन शिक्षण, अध्यात्म, नशाबंदी, प्राणीहत्या, मांसाहारबंदी, अंधश्रद्धा निर्मूलन, जातीय विषमता नष्ट करणे, अशा अनेक विषयांवर समाज प्रबोधन करुन समाजात बदल घडवला, भगवानबाबांनी एकर इक्का पण पोरं शिकवाअशी शिकवण देवुन एक पिढी घडवली, असे किर्तन प्रसंगी बाबांच्या जिवन प्रवास व कार्यपद्धतीवर कीर्तनातून प्रकाश टाकताना म्हटले. या कार्यक्रमाला शिवसंग्राम अध्यक्षा डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या चरणी नतमस्तक होवुन भगवान बाबांनी आयुष्यभर जाति विरहित सर्व समाजाला एकत्र आणण्याचे काम केले, असे म्हटले. किर्तनानंतर महाप्रसादाच्या पंगतीचे आयोजन केले होते. यावेळी महाराज व उपस्थित, अतिथी मान्यवर, टाळकरी सर्वाचे स्वागत प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप यांनी केले.

या किर्तनासाठी वैजीनाथ सानप, बाबुराव मुंडे, किशन माने, बंडु जटाळ, इंद्रजित भंडारे, श्रीहर्ष धांडे, वैभव येडे, आश्रुबा सानप, पवन ढाकणे, केशव बडे यांनी साथ संगत केली. या कार्यक्रमाला डॉ. ज्योतीताई मेटे, वरद ग्रुपचे कल्याण दाजी पिंगळे, इंजि.उत्तमराव मिसाळ, बीड कृ उ बा संचालक पंडित माने, अॅड सुनिल ढाकणे, ह भ प राजु महाराज लोखंडे, ह भ प भास्कर जोशी महाराज, ह भ प कचरू महाराज चव्हाण, ह भ प श्रीमंतबापु तांदळे, ह भ प दादाहारी गिते, उतमराव दोडके, एम.डी. पांचाळ नाना, राजेंद्र घोलप, विजय वीर, ए.जी. नागरगोजे, आर.के. भोंडवे, आश्रुबा नागरगोजे, नारायण खेडकर, धनंजय सानप, निलेश खेडकर, दिनकर ढाकणे, जगदीश नागरे, गोरख इंदुलकर, वसंत सानप, संतोष सावंत, पाबळे इत्यादी सह प्रचंड मोठ्या प्रमाणात भाविक भक्त, नागरिक उपस्थित होते.



## जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत दहीहंडी उत्सव साजरी

**चौसाळा । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा शाळेत पहिली ते चौथी प्राथमिक विभाग दहीहंडीचे आयोजन केले होते. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक विभागाने दहीहंडीचे आयोजन केले होते.

कला संस्कृती व आपली सण उत्सव हे विद्यार्थ्यांना कळावे ह्या मागचा उद्देश यावेळी बाळ गोपाळ यांनी वेशभूषा धारण केली होती तसेच साऊंड सिस्टमवर गीते लावून बालगोपाळांनी आनंद लुटला. यावेळी ज्येष्ठ शिक्षक सुभाष काकड, तंत्रस्नेही शिक्षक सुधीर भाऊ जाधव शाळेतील प्राथमिक विभागातील रामचंद्र भोसले, श्रीमती शुभांगी जोशी, शकुंतला तांबडे, मोहर जोगदंड, शालिनी काकडे, अलका गुजर, वर्ष मोठे, वर्षाराणी कागदे, गायकवाड, माधुरी इनकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.

## सुमेध शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त मुकबधिर शाळेत शालेय साहित्य व फळ वाटप

### ज्ञानप्रबोधिनी व नालंदा विद्यालयात शालेय साहित्य वाटप

**केज । प्रतिनिधी**

नगरसेवक सुमेध (बप्पा) शिंदे यांचा वाढदिवस म्हणजेच स्मृती दिन दिनांक १५ ऑगस्ट रोजी असतो त्या निमित्ताने यांच्या स्मृतिदिनानिमित्त एल.एफ.सी ग्रुप व सुमेध बप्पा शिंदे विचार मंच यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिर, फुलेनगर, केज येथे शालेय साहित्य वाटप व १० वाजता नालंदा विद्यालय, फुलेनगर, केज येथे शालेय साहित्य



वाटप कार्यक्रम संपन्न झाला. तसेच दुपारी ११.०० वाजता मुकबधिर शाळा, उमरी (केज) येथे शालेय साहित्य व फळ वाटप करण्यात आले. यानंतर उपजिल्हा रुग्णालय, केज येथेही फळ वाटप कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमास जेष्ठ नेते हरूनभाई इनामदार नगराध्यक्षा सीताताई बनसोड, शाळेच्या मुख्याध्यापिका शिंदे मॅडम व सुर्यवंशी मॅडम, नालंदा विद्यालय चे मुख्याध्यापक नंदकुमार मस्के, ज्ञानप्रबोधिनी शाळेचे मुख्याध्यापक दयानंद देशमुख तसेच शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमांना विवेक बनसोड, किरण जोगदंड, अमोल मिसाळ, अशोक गायकवाड, अशोक धिवार, बाळा इनकर, सुहास समुद्रे, विनोद इनकर, गणेश गालफाडे, अभिजीत तुपारे, विकी लांडगे, प्रेम मस्के, आकाश शिंदे, संदेश ताकतोडे, लखन हजारे, रेवन आप्पा नखाते, पवन बनसोड, विकी लोखंडे, प्रवीण लांडगे, आदित्य मस्के, आदित्य जावळे, बाळा भांगे, शाहरूख पटेल, ओम शिनगारे, सूरज वैरागे, सोनू लष्करे, सोनू जोगदंड, तात्या गवळी, प्रदीप गायकवाड, कुणाल पोळ आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन एल.एफ.सी. ग्रुप व सुमेध बप्पा शिंदे विचार मंच यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी दिवंगत सुमेध शिंदे यांच्या कार्याचा गौरव करत समाजोपयोगी उपक्रमांद्वारे त्यांची आठवण जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

## समाज सेवक इफ्तेखार जकीबाबा फाउंडेशन माजलगाव च्या वतीने शिबीरात ३८३ रक्तदातांनी केले रक्तदान

### प्रथमच चाळीस मुस्लिम महिलांनी केले रक्तदान

**माजलगाव । प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या ७९ व्या स्वर्ण महोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी प्रमाणे ह्याही वर्षी जमात ए इस्लामी हिंद व समाज सेवक इफ्तिखार ज़की बाबा सोशल अण्ड वेल्फेअर फाउन्डेशन माजलगाव च्या संयुक्त विदमाने घेण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबीरामध्ये तब्बल ३८३ रक्त दात्यांनी रक्तदान देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवुन देणारे शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. जकीबाबा फाउन्डेशन माजलगाव मध्ये समाजात निर्पक्ष निस्वार्थ पणे काम करत आहेत. आजपर १०० हुन अधिक कॅन्सर, हृदयरोग सारखे रुग्णाचा मोफत उपचार करुण आनले सर्व जाती धर्माच्या लोकांच्या, शैक्षणिक, आर्थिक व



सामाजिक समस्या सोडविण्यासाठी सदैव पुढाकार घेत असते.

या वर्षी तर जमात ए इस्लामी च्या महिला विंग ने ही या व्दारे रक्त दान शिबीरात सहभाग घेऊन माजलगाव चा इतिहासच घडवला तब्बल १५० हून अधिक महिलांनी रक्त देण्यास नाव नोंदवलं व ४० महिला रक्त दान करण्यात सक्षम झाले. हे रक्त दान शिबीर सफा टावर, अंबेडकर चौकात घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रकाश सोळंके याच्या हस्ते करण्यात आले त्यांनी आपल्या भाषणात जकी बाबानी केलेल्या सामाजिक कामावर प्रकाश टाकला तर कार्यक्रमच्य अध्यक्ष स्थान मोहन जगताप हे होते तर इरफान मिर्जा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व फांडेशन चे अध्यक्ष शेख शौकत यानी आपले वर्षभरात केलेले कामाचा सविस्तर माडला व जमात ए इस्लामी चे ता.अध्यक्ष माजेद खान सर यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या प्रसंगी काही प्रमुख उपस्थितानी आपले मत व्यक्त करत फांडेशन चे कार्यास शुभेच्छ दिले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्या साठी शेख शाहेद मनियार, शेख सलीम जरगर, शेख जमीर, सय्यद खेसर, शेख असद, सय्यद सत्तार, हबीब सिद्दीकी, मारुफ इनामदार, नाजेर, रायस चाउस, जुल्फिकार भाई, यावर, अजू भाई, ग़जमफर, सुमेर पटेल, आसीफ भाऊ, इमरान खान, मुफ्ती शबीर, अहमद, शफीक भाई, सुजात मिर्जा यांनी कठोर परिश्रम केले.




**बीड :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ बीड जिल्हा सचिव शेख वसीम यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना फहीम इनामदार, पोलीस बॉईज असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रविंद्र शिनगारे.

## लिंबागणेश येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवानिमित्त संगीतमय भागवत कथा सप्ताह उत्साहात

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे लिंबागणेश येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी सार्वजनिक महोत्सवानिमित्त संगीतमय श्रीमद् भागवत कथा सप्ताह (दशम स्कंध) उत्साहात पार पडला. दि.८ ऑगस्टपासून सुरू झालेल्या या धार्मिक सोहळ्याची सांगता दि.१६ ऑगस्ट रोजी काल्याच्या कीर्तनाने झाली. सप्ताहभर सकाळी पारायण, दुपारी उटी-उपहार, सायंकाळी आरती-प्रवचन आणि रात्री भागवत कथा असे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प.पू. महंत श्री ओंकार व्यास बाबा शास्त्री महानुभव (श्रीक्षेत्र पांचाळेश्वर ता.गेवराई जि.बीड) यांच्या प्रवचनाने भाविकांना अध्यात्मिक अनुभव मिळाला.

समारोप प्रसंगी पोहीचा देव संस्थानचे महंत रंगनाथभाऊ वायंदेस्कर, महंत विश्वनाथ बाबा, तसेच पंचक्रोशीतील महानुभव भाविक उपस्थित होते. भजनी मंडळींमध्ये मृदंगवादक संदीप आमटे, पांडुरंग वाणी, बाजीराव दशमे, बारीक ढास, सतिश शिंदे आदींनी सुरेल भजनांनी वातावरण भारावून टाकले. शुक्रवारी मध्यरात्री श्रीकृष्ण जन्मोत्सव अत्यंत जल्लोषात साजरा करण्यात आला. श्रीकृष्ण जन्मानंतर गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

या धार्मिक सोहळ्यासाठी मंदिराचे पुजारी विजय पाटोदेकर, राजेभाऊ आप्पा गिरे, कल्याण वाणी, सरपंच बालासाहेब जाधव, गोवर्धन गिरे, रामकिसन गिरे, अर्जुन गिरे, सुदाम रणखांब, विनायक वाणी, विक्रांत वाणी, संतोष भोसले, विठ्ठल कदम, रणजित भोसले, बसवंता खाडीलकर आदी मान्यवर व गावकरी यांनी परिश्रम घेतले. काल्याच्या कीर्तनानंतर उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि सप्ताहाचा समारोप भक्तीमय वातावरणात झाला.





आज दिनांक १६ ऑगस्ट २०२५ वार शनिवार रोजी श्री व्यंकटेश पब्लिक स्कुल प्राथमिक विभाग अदित्य नगरी बीड येथे गोकुळाष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी राधा कृष्णाच्या वेशभूषेत उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णांच्या गाण्यावर नृत्य सादर केले. कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला व हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्राचार्य हावळे सर, मुख्याध्यापक धुमाळ सर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## पैगंबर मोहम्मद (स) च्या जयंती १२ रब्बील अव्वल मिलादुन्नबीच्या शुभ मुहूर्तावर दैनिक संघर्ष वतीने रक्तदान शिबीर आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

जगातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती व इस्लाम धर्माचे प्रमुख प्रेषीत पैगंबर मोहम्मद (स) च्या जयंती १२ रब्बील अव्वल मिलादुन्नबी च्या शुभ अवसरावर दैनिक संघर्ष वतीने दरवर्षाप्रमाणे यावर्षीही दिनांक ४ सप्टेंबर २०२५ गुरुवार रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन दैनिक संघर्ष कार्यालय बशीरगंज बीड या ठिकाणी सकाळी दहा वाजता पासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत करण्यात आले असून या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त संख्येने सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की दैनिक संघर्ष हे दैनिक अल्हीलाल समोरचे माध्यमाने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्यसुद्धा करत आहे जगातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती पैगंबर मोहम्मद (स) यांची जयंतीच्या निमित्ताने दरवर्षी दैनिक संघर्षाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. यावर्षी या रक्तदान शिबिराचे आयोजन दि.४ सप्टेंबर गुरुवार रोजी करण्यात आले असून या रक्तदान शिबिरात बहुसंख्येने सहभागी घेण्याचे आवाहन दैनिक संघर्ष संपादक खमरूल ईमान खान, उपसंपादक कलीम इनामदार, मिर्झा फैसल बेग आदींनी केले आहे या रक्तदान शिबिराचे निमित्ताने या मोबाईल क्रमांक ८७८८२४००८६ आपले नावाची नोंदणी करण्याची विनंती करण्यात आली आहे.

## माजी मुख्याध्यापकांनी भारतीय स्वातंत्र्य दिन इंग्लंडमध्ये केला साजरा



### इंग्लंड येथे हिंमत नाटकर यांना भेटायला गेलेल्या माजी मुख्याध्यापक गणपतराव नाटकर यानी राष्ट्रीय एकात्मतेचा दिला संदेश

**तलवाडा । प्रतिनिधी**

इंग्लंड येथे स्थायिक असणाऱ्या हिंमत नाटकर या आपल्या मुलाला भेटायला गेलेल्या माजी मुख्याध्यापकाचे भारतीय प्रेम, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन भारतामध्ये झेंडावंदन साजरा करण्यासाठी उपस्थित नसल्याने थेट इंग्लंड येथे माजी मुख्यध्यापक गणपतराव नाटकर यांनी झेंडावंदन करून भारतीय एकात्मतेचा संदेश देत इंग्लंडमध्ये भारत माता की जय घोषणा दिल्या गणपतराव नाटकर यांच्या या भारतीय प्रेमाबद्दल भारतातून शुभेच्छाचे वर्षाव करण्यात येत आहे.

गणपत नाटकर मूळ गेवराई तालुक्यातील तलवाडा या गावचे आहेत. त्यांचा मुलगा हिमत नाटकर इंग्लड येथे स्थायिक असल्याने भेटायला आलेले माजी मुख्याध्यापक गणपतराव नाटकर यांनी १५ ऑगस्ट दिन साजरा इंग्लंड येथे केला आहे. त्यांच्या या राष्ट्र प्रेमाला सर्वांनी शुभेच्छा दिल्या असून माजी आमदार अमरसिंह पंडित, आमदार विजयसिंह राजे पंडित, जयसिंह पंडित यांच्या सह तलवाडा करांनी अभिनंदन कौतुक केले आहे.

## धम्मानंद मुंडे यांच्या स्मृती दिनानिमित्त वीर फाउंडेशनच्या वतीने सिरसाळा मा. सरपंच राम किरवले यांना समाज भूषण पुरस्कार

**परळी । प्रतिनिधी**

दलित पँथर चळवळीतील निडर, अभ्यासू आणि जनतेसाठी अखंड झटणारे पँथर नेते धम्मभूषण धम्मानंद मुंडे यांच्या सहाव्या पुण्यतिथीनिमित्त वीर फाउंडेशन च्या वतीने आयोजित समाजभूषण पुरस्कार आयोजित सोहळा त्रिरत्न बुद्ध विहार भिम वाडी येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व दीप प्रज्वलन करून मान्यवरांने अभिवंदन केले.

त्यानंतर पँथर चळवळीतील मोलाचे योगदान देणारे आणि समाजातील वंचित घटकांसाठी हा जीवन लढा देणारे धम्मानंद मुंडे यांच्या स्मृतीना उपस्थितांनी कृतीतज्ञेने अभिवादन केले. या सोहळ्यात शिव, फुले, शाहू, आंबेडकर



विचारसरणी जोपासत सामाजिक, शैक्षणिक आणि संस्कृती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नेते, कार्यकर्ते, युवा व भगिनींना समाजभूषण आणि विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारासोबत टाळ्यांच्या कडकडाटाने सभागृह दुमदुमले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य कमलाकर कांबळे हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, ओबीसीचे नेते टीपी मुंडे, रिपाई नेते सचिन कागदे, भाजप शहर अध्यक्ष उमाताई सनशेटे, रिपब्लिकन सैन्याचे जिल्हाध्यक्ष विजय दादा साळवे, रिपाई एकतावादीचे राज्यसचिव पंडित झिंजुर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उत्तम माने, ज्येष्ठ साहित्यिक तथा संपादक औरंगाबाद दैनिक महाराष्ट्र प्रतिमाचे संपादक ज्ञानोबा सुरवसे, दैनिक संघर्ष नेता चे संपादक म्हणून हावळे, पत्रकार भगवान समुद्रे यांच्यासह अनेक मान्यवर कार्यकर्ते व युवा उपस्थित होते.

या यावेळी सिरसाळा ग्रामपंचायतचे मा. सरपंच रामदादा किरवले. हे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आंबेडकर चळवळीतील बीड जिल्ह्यातील व परळी तालुक्यात नावलौकिक असणाऱ्या नेतृत्व म्हणजे राम किरवले कायद्याचा सखोल अभ्यास अन्यायावर मत करणार झुंजार असं लेखणीतून नाव समोर येणार प्रत्येक समाजाच्या तळागाळात जाऊन अन्यायाविरुद्ध बंड पुकारणार नाव म्हणजे ते राम किरवले यासाठीच त्यांना धम्मानंद मुंडे समृद्धी दिनानिमित्त समाज भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला. त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व सत्कार होत आहेत. वीर फाउंडेशन तर्फे समाज भूषण पुरस्काराचा भव्य सोहळा परळी या ठिकाणी घेण्यात आला आहे. सर्व पुरस्काराचे अभिनंदन करण्यात आले.

# धोंडराई ग्रामपंचायतला दै.महाराष्ट्र आरंभ'च्या दणक्याने अखेर जाग..

## गुटखा-पिचकाऱ्यांनी विद्रूप झालेल्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या भिंतींवर स्वच्छतेचा झेंडा!

### पंधरा वर्षांत जे झाले नाही ते 'महाराष्ट्र आरंभ'च्या एका बातमीने घडले; स्वातंत्र्य दिनी ग्रामपंचायत सजली

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयाच्या भिंतींवर पिचकाऱ्या व गुटख्याचे डाग, रंगरंगोटी आणि तडे जाण्याचे प्रकार समोर आले होते. हे दृश्य केवळ अस्वच्छतेचेच नव्हे तर आरोग्यासाठीही धोकादायक ठरत असल्याचे नागरिकांनी व्यक्त केले होते. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर या ग्रामपंचायतीने स्वच्छता मोहीम हाती घेतली होती व त्यात यशही मिळवले, तरीसुद्धा कार्यालयाच्या मुख्य दरवाज्याच्या पाठीमागे आणि भिंतींवर गुटख्याचे डाग व दुर्गंधी जाणवत होती. याबाबत दैनिक महाराष्ट्र आरंभ या वृत्तपत्राने दि.०६ ऑगस्ट रोजी बातमी प्रसिद्ध केली होती. ही बाब उघडकीस आल्यानंतर धोंडराई ग्रामपंचायतच्या विद्यमान सरपंचांसह कर्मचाऱ्यांना अखेरीस जाग आली असून स्वच्छतेकडे लक्ष देण्यास सुरुवात केल्याचे दिसून आले आहे.**





याबाबत सविस्तर वृत्त असे की, धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयाची भिंती गुटखा-पिचकाऱ्यांच्या डागांनी विद्रूप झाल्या होत्या. गावाच्या प्रमुख कार्यालयात अशा अस्वच्छ दृश्यांमुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत होते. गावासाठी पारदर्शक कारभार आणि स्वच्छ प्रशासन अपेक्षित असताना कार्यालयातच स्वच्छतागृह नसल्याने कर्मचाऱ्यांची मोठी कुचुंबना होत असल्याचेही समोर आले आहे. गावातील स्वच्छतेबाबत अनेकदा चर्चा झाली असली तरी ग्रामपंचायत कार्यालयातील अस्वच्छता हा कायमच चर्चेचा विषय राहिला. यामुळे गावकऱ्यांमध्ये नाराजी होती.

दरम्यान, दैनिक महाराष्ट्र आरंभने दि.०६ ऑगस्ट रोजी या प्रकरणावर एक बातमी प्रसिद्ध करत कार्यालयातील गुटखा-पिचकाऱ्यांचे डाग, धुळखात पडलेले साहित्य आणि अस्वच्छ वातावरण याकडे लक्ष वेधले होते. या बातमीनंतर अखेर विद्यमान सरपंच व सदस्यांना जाग आली. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयाची रंगरंगोटी करण्यात आली. अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या इमारतीला नवसंजीवनी मिळाल्याने ग्रामपंचायत कार्यालयाचे रूप पालटले आहे. गाव स्वच्छतेसाठी विद्यमान सरपंच सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले जाते, परंतु कार्यालयाची दुरवस्था ही कायमच निंदनीय बाब ठरत होती. आता मात्र कार्यालयाच्या भिंती रंगवून स्वच्छतेची नवी सुरुवात झाली असून गावकऱ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.


धोंडराई ग्रामपंचायत कार्यालय अस्वच्छतेमुळे चर्चेत
कार्यालयाच्या भिंतीवर पिचकाऱ्या पण गुटख्यांची रंगरंगोटी
गेवराई । प्रतिनिधी
स्वातंत्र्यदिनानिमित्त पारदर्शी कारभाराची अपेक्षा
स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेच्या बाबतीत लक्ष न देता ग्रामपंचायत कार्यालयातील सफाई कर्मचारी जाणूनबुजून दुर्लक्ष करते की काय, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. दुसरीकडे झाडे लावण्यात सर्व कर्मचारी व्यस्त आहेत पण सर्व कार्यालयाच्या प्रमुखांना स्वच्छतेबाबतीत केव्हा जाग येणार, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. कार्यालयामध्ये स्वच्छतेसोबत पारदर्शी कारभार ठेवण्याची नागरिकांची अपेक्षा आहे.
06 Aug 2025 - Page 2 | epaper.maharashtraaarambh.com
Powered by softisky | 9764331134

**जे पंधरा वर्षांत झाले नाही ते 'महाराष्ट्र आरंभ'च्या एका दणक्याने झाले!**

धोंडराई ग्रामपंचायतीत पंधरा वर्षांपासून जी सुधारणा झाली नाही ती अखेर 'दैनिक महाराष्ट्र आरंभ'च्या बातमीच्या दणक्याने झाली. अस्वच्छता, गुटखा-पिचकाऱ्यांचे डाग, धुळखात पडलेले साहित्य आणि दुरवस्थेमुळे गावकऱ्यांच्या नाराजीचे केंद्र बनलेले ग्रामपंचायत कार्यालय अखेर स्वातंत्र्य दिनी सजवले गेले. ६ ऑगस्ट रोजी 'दैनिक महाराष्ट्र आरंभ'ने ग्रामपंचायत कार्यालयाच्या दुरवस्थेवर प्रकाश टाकत कार्यालयाचा विद्रूप चेहरा आणि कर्मचाऱ्यांची होत असलेली कुचुंबना अधोरेखित केली होती. या वृत्तामुळे गावकऱ्यांमध्ये मोठी चर्चा रंगली आणि ग्रामपंचायतीच्या सरपंच व सदस्यांवर दबाव निर्माण झाला. गावकऱ्यांनी याचे स्वागत केले असून, जे पंधरा वर्षांत झाले नाही ते 'महाराष्ट्र आरंभ'च्या एका बातमीने घडवून आणले, अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. गाव स्वच्छतेबाबत ही नवी सुरुवात ठरावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पुणे शहरातील आ.सुरेश धस यांच्या आभार दौऱ्यास उपस्थित रहा : बंडु तोडकर, बंटी सगळे

**आष्टी । प्रतिनिधी**



आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघातील नागरीक पुणे शहरातील विविध भागात कामानिमित्त आलेल्या मतदारसंघ वासीयांचे आभार व्यक्त करण्यासाठी आ.सुरेश धस रविवार दि.१७ ऑगस्ट रोजी येणार आहेत. या आभार दौऱ्यासाठी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बंटी शेठ सगळे, बंडुसाहेब तोडकर, शहादेव चौधरी यांनी केले आहे. मराठवाड्यातील आष्टी, पाटोदा, शिरूर मतदारसंघातील जनतेच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आमदार सुरेश धस हे पुणे शहरातील चिंचवड येथे येत आहेत. रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वा.आहेर गार्डन, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे येथे जनतेशी संवाद साधणार आहेत.

या कार्यक्रमात मतदारसंघातील विकासकामे आणि जनतेच्या अपेक्षांबाबत चर्चा होईल. स्नेह मेळावा घेऊन आभार मानणार आहेत. आ. सुरेश धस यांनी नेहमीच जनतेच्या हिताला प्राधान्य दिले असून, त्यांच्या या भेटीमुळे पुण्यातील मराठवाड्याच्या जनतेशी त्यांचा संवाद अधिक दृढ होईल अशी अपेक्षा आहे. पुणे शहरात रहिवाशी असलेल्या सर्व जनतेने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन बंडुसाहेब तोडकर, शहादेव चौधरी, कुमार कोकणे, गणेश कदम, वलवळे राजेंद्र, अनिल टेकाळे, बंटी सगळे, इंद्रजित पवार यांच्यासह पुणे शहरातील प्रमुखांच्यावतीने करण्यात येत आहे.

## मुलीचा शोधासाठी कुटुंब जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार!

### अंभोरा पोलिसांवरील विश्वास संपला

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

दोन महिने झाले, अपहरण झालेल्या मुलीचा शोध लागेना, तपास सुरू आहे. आम्ही त्याच कामात आहोत. लवकरच तपास लागेल असे नेहमीचेच बोलबच्चन करत वेळ मारून नेणाऱ्या अंभोरा पोलिसांना जर अपहरण झालेली मुलगी सापडू शकत नसेल तर कार्यपद्धतीवर प्रश्न चिन्ह निर्माण होऊन विश्वास संपल्यात जमा आहे. आता मुलीचा शोध लागावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा पिडीत कुटुंबाने दिला आहे.



आष्टी तालुक्यातील अंभोरा ठाणे हद्दीतील एका गावातील अल्पवयीन मुलीचे तिच्याच गावातील तरूणाने १८ जून रोजी अपहरण केले. कुटुंबाने नातेवाईक, पाहुणे, रावळे, देवस्थान, अश्या अनेक ठिकाणी शोध घेतला पण कुठेच मिळून न आल्याने अंभोरा ठाण्यात १९ रोजी अपहरणाचा गुन्हा दाखल केला. आजपर्यंत कसलाच तपास लागला नाही. मानसिकरित्या खचलेल्या बापाला, आणि आईला शेवटी पर्याय शिल्लक नसल्याने व पोलिसांकडून हालगर्जीपणा होत असल्याने पोलिस अधीक्षक, जिल्हाधिकारी याना निवेदन देऊन १८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याचा इशारा दिला आहे.

**पोलिसांनी ठरवलेच तर समुद्रात हरवलेली सुई सुध्दा सापडते...**

पोलिसांनी मनापासून काम करण्याचे ठरवून एखाद्या गुन्हाचा किंवा हरवलेल्या व्यक्तीचा शोध घ्यायचे मनावर घेतले तर अशक्य असे काहीच नाही. पोलिस जर समुद्रात हरवलेल्या सुईचा शोध घेत असतील तर इथे दोन महिने झाले तरी मुलीचा शोध घेणे काय अवघड फक्त मनात तेवढी जिद्द यायला हवी.

**मोठ्याचा आला गाडा; गरिबांचे झोपडे मोडा!**

पूर्वीपासून एक म्हण आपल्याकडे बोलली जाते.की मोठ्याचा आला गाडा, गरिबांचे झोपडे मोडा. अगदी या प्रमाणे पोलिसांचे काम सुरू आहे. मोठ्याचे न होणारे काम देखील चुटकी सरशी होते. पण गरिबाला मात्र ठाण्याचे उंबरे झिजवून देखील न्याय मिळत नाही. न्यायासाठी उपोषणास बसावे लागते. हे दुर्दैव आहे. साहेब खुर्ची सोडा, मन हळव करून बाहेर पडा, तपास लागेल. ठाण्यातील खुर्चीवर बसून तपास लागत नाही, त्यासाठी खुर्ची सोडून बाहेर पडा, बातमीदार तयार करा, स्वताच मन एक बाप असल्याचे हळव करून पहा २४ तासांत अपहरण झालेली मुलगी दारात येईल, अशी प्रतिक्रिया पिडीत कुटुंबाने तळतळून व्यक्त केली.

## प्रसिद्ध उद्योगपती शिवशताक्षी मसाल्याचे मॅनेजिंग डायरेक्टर शितलशेठ चिवटे यांची सदिच्छा भेट

**कडा । प्रतिनिधी**

येथे कुरडवाडी येथील प्रसिद्ध उद्योगपती शिवशताक्षी मसाल्याचे मॅनेजिंग डायरेक्टर शितल शेठ चिवटे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी सर्व व्यापाऱ्यांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जैन श्रवक संघ कडाचे अध्यक्ष रतिलाल जी कटारिया, सामाजिक कार्यकर्ते तथा कडा शहराचे माजी सरपंच अनिल तात्या ढोबळे, व्यापारी संघटनेचे सचिव नितीन शेठ शिंगवी, प्रकाशशेठ श्रीश्रीमाळ, रामशेठ ससाने, अमित शेठ राठोड, सचिन शेठ गांधी, सागरशेठ श्रीश्रीमाळ, संदीप शेठ चानोदीया, वसंत शेठ चोरबेले, गणेशशेठ कटारीया, आयुब मोमीन, नासिर पानसरे, निहाल शिंगवी,



विनित शिंगवी व शिवशतक्षी मसाल्याचे कंपनीचे प्रतिनिधी आर एस एम योगेश कुंभार सर व एक एस एम लींगेश्वर तकटे सर उपस्थित होते.

यावेळी उद्योगपती शितल शेठ यांनी सांगितले की खूप कमी दिवसात आमचे कष्ट व व्यापाऱ्यांची व ग्राहकांची साथ या जोरावर बाजारपेठेत आम्ही यशाचे शिखर सर करत आहोत. तसेच त्यांनी सर्व व्यापाऱ्यांना कुरूडवाडी येथे कंपनी व्हिजीट साठी येण्याचे निमंत्रण दिले. तर सर्व व्यापाऱ्यांकडून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर त्यांनी कडा येथील व्यापारी संघटनेचे अध्यक्ष नागेश तात्या कर्डिले यांच्या शिवनेरी पतसंस्था येथे भेट दिली. पतसंस्थेकडून त्यांचा व्यापारी संघटनेचे माजी अध्यक्ष नवनाथ दादा कर्डिले यांच्याकडून सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे अमोल कर्डिले व प्रशांत गिलचे उपस्थित होते.

## गेवराई पंचायत समितीमध्ये आता सरपंचच झाला दलाल

### गटविकास अधिकाऱ्यांची सही आणून देतो म्हणून करतो फाईल गोळा

**टाकरवण । प्रतिनिधी**




गेवराई पंचायत समिती मध्ये आता सरपंच करू लागला आहे. दलालीचा धंदा गावचा विकास करायचा सोडुन लोकांना सांगतो माझे गटविकास अधिकारी यांच्या सोबत चांगली ओळख आहे तुमच्या फाईल माझ्या कडे द्या मी सह्या आणून देतो आणि एक्या सहीचे पाच हजार रुपये घेतो सर्वसामान्य लोकांचे काम करायचं हे सरपंचाचे काम असते परंतु हा सरपंच सांगतो बी डी ओ साहेब सही करत नाहीत. त्यासाठी एक्या फाईलच्या सहीला पाच हजार रुपये लागतात आणि ते पन पैसे घेऊन सुद्धा एक एक महिना सह्या करून घेत नाही तो लोकांना जाणून बुजून त्रास देत आहे. त्याने पंचायत समिती मध्ये गावचा विकास करणे सोडून दलाली करणे सुरु केले आहे.

## सततच्या पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

### नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या : सचिन शिंदे

**नेकनूर । प्रतिनिधी**

नेकनूर मंडळासह परिसरातील भागात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केली आहे.



सततच्या पावसामुळे शेतामधील कांदा पिक अक्षरशः नेस्तनाबूत झाले आहे. सोयाबीन, कापूस, मुग, उडीद या पिकासह अन्य पिकांना सुध्दा हानी पोहोचली आहे. काही शेतकऱ्यांचे मुग व उडीद पीक हाती येऊन गेले अशी परिस्थिती झाली आहे. सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेती पिकाचे नुकसान झाले आहे, तसेच फळबागांना देखील या पावसामुळे मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे. सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या संपूर्ण शेतकऱ्यांचे पिकांचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केली आहे.

## राज कंट्रक्शन कंपनीकडून दौलावडगाव ते अमळनेर रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम फक्त नावालाच झाले

**आष्टी । प्रतिनिधी**

अहमदनगर वरून येताना अनेक वाहन चालक जामखेड मार्गे खड्डे पडल्यामुळे व काम अजून बाकी असल्यामुळे या मार्गे बीडला येतात परंतु या रस्त्याचे मध्यंतरी काम झाले खड्डेही बुजवली परंतु तेथून होतो आता गुडघे एवढे खडे पडले आहेत मग या कंपनीला काम कोण होतं किंवा या कंपनीवर कोणत्या अधिकाऱ्यांचा आशीर्वाद आहे हीच कळत नाही.

अनेक ठिकाणी अन्नमस्ते येणारे खड्डे पडले आहेत. परंतु अधिकारी व ठेकेदार संगणमताने आणि काम करत असल्याने या रस्त्यावर काम झाले की, एक-दोन महिन्यातच खड्डे पडायलासुरुवात होते. मग एक काम करतात तरी कसे डांबर वापरताना ऑइल टाकून डांबर वापरतात त्यामुळे



या रस्त्यावर सतत खड्ड्याचा त्रास वाहनधारकांना सहन करावा लागत आहे मग अधिकाऱ्यावर कारवाई का होत नाही असा प्रश्न सध्या नागरिकांतून व वाहनधारकांकडून होत आहे. प्रत्येक वेळी पीडब्ल्यूडी कडून यांना बजेट दिले जातात मग हे पैसे जातात कुठे मग हे खर्च किती करतात असा प्रश्न याचा उपस्थित होत आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. सामाजिक न्याय भवन परिसरात आयोजित कार्यक्रमात यावेळी आमदार सर्वश्री संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी मध्ये पोलीस विभागातील पोलीस उपनिरिक्षक श्रीमती पल्लवी भाऊसाहेब जाधव, पोलीस हवालदार अशोक बापुराव शिंदे, पो.ह. प्रदिप निवृत्ती येवले, पोलीस उपनिरिक्षक श्रीराम रामदास खटावकर, पो.ह. शेख आसेफ शेख शमीम महसूल विभागातील



निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, नायब तहसीलदार सचिन सुरेशराव देशपांडे, ग्राम महसूल अधिकारी सलीम शेख, संघर्षकुमार ओवे, सहायक महसुल अधिकारी जितेंद्र साहेबराव जाधव, राहुल रामनाथ बलाढ्ये, मंडळ अधिकारी श्रीमती शितल लक्ष्मणराव चाटे, परमेश्वर त्रिंबक काळे, सरपंच श्रीमती शेख मन्नाबी मुजफर पटेल क्रिडा विभागात क्रिकेटसाठी श्रावणी अजिनाथ तर दळवी, तायक्कांदोसाठी कु. नयन अविनाश बारगजे, व्हॉलीबॉलसाठी अफताब कुरेशी नौशाद, कबड्डीसाठी महारुद्र मधुकर गर्जे, खो-खोसाठी प्रताप शहादेव तुपे, योगा कु. सभाषिणी विनायकराव वझे, बेसबॉल/सॉफ्टबॉलसाठी आदित्य अरविंद विद्यागर तसेच यावेळी अवयव दान करणाऱ्या नातेवाईकांचे देखील यावेळी सत्कार करण्यात आले. यामध्ये श्रीमती कोटुळे कोमल गोकुळदास (पत्नी) व बाबुराव कोटुळे (वडील), अवयवदाता यांचे नातेवाईक प्रविण बालासाहेब निनाले (मुलगा), अवयवदाता यांचे नातेवाईक सुखदेव बाबुराव गायके (वडील), अधिसेविका श्रीमती गिरी रमा गोविंदराव, जिल्हा आरोग्य अधिकारी प्रातिनिधीक स्वरूपात डॉ. उल्हास गंडाळ, सुभेदार बलभिम किसन चिंचाणे, हवालदार अब्दुल वाजिद अब्दुल अजीज, कारागृह शिपाई रामआप्पा भागुजी परळकर, सहायक संशोधन अधिकारी महेश पुरूषोत्तम ठाकूर आदींचा यावेळी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला.

यावेळी भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सांस्कृतीक कार्यक्रम देखील पार पडला. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल शेळके, ज्ञानेश्वर कोटुळे, अथर्व शेळके यांनी केले. यावेळी लोकप्रतिनीधी, नागरिक, शालेय विद्यार्थी-विद्यार्थींनी, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार यांची उपस्थिती होती.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT